सहायक मधि. (विभागीय) स्पर्धा परीक्षा - 2013
परीक्षा दि. 23 फेब्रुवारी, 2014.

StudentBounty.com

**A**

**2014**

CODE :

प्रश्नपुस्तिका क्रमांक
**BOOKLET NO.**

**एकूण प्रश्न : 150**
**एकूण गुण : 300**

**वेळ : $2\frac{1}{2}$ ( अडीच ) तास**

**प्रश्नपत्रिका क्र. 1**

# सूचना

(1) सदर प्रश्नपुस्तिकेत 150 अनिवार्य प्रश्न आहेत. उमेदवारांनी प्रश्नांची उत्तरे लिहिण्यास सुरुवात करण्यापूर्वी या प्रश्नपुस्तिकेत सर्व प्रश्न आहेत किंवा नाहीत याची खात्री करून घ्यावी. असा तसेच अन्य काही दोष आढळल्यास ही प्रश्नपुस्तिका समवेक्षकांकडून लगेच बदलून घ्यावी.

(2) आपला परीक्षा-क्रमांक ह्या चौकोनांत **न विसरता बॉलपेनने** लिहावा.

| परीक्षा-क्रमांक | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | केंद्राची संकेताक्षरे | | | | | | | शेवटचा अंक |

(3) वर छापलेला प्रश्नपुस्तिका क्रमांक तुमच्या उत्तरपत्रिकेवर विशिष्ट जागी उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे **न विसरता नमूद करावा.**

(4) या प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाला 4 पर्यायी उत्तरे सुचविली असून त्यांना 1, 2, 3 आणि 4 असे क्रमांक दिलेले आहेत. त्या चार उत्तरांपैकी सर्वात योग्य उत्तराचा क्रमांक उत्तरपत्रिकेवरील सूचनेप्रमाणे तुमच्या उत्तरपत्रिकेवर नमूद करावा. अशा प्रकारे उत्तरपत्रिकेवर उत्तरक्रमांक नमूद करताना तो संबंधित प्रश्नक्रमांकासमोर छायांकित करून दर्शविला जाईल याची काळजी घ्यावी. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

(5) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत. यास्तव सर्व प्रश्नांची उत्तरे द्यावीत. घाईमुळे चुका होणार नाहीत याची दक्षता घेऊनच शक्य तितक्या वेगाने प्रश्न सोडवावेत. क्रमाने प्रश्न सोडविणे श्रेयस्कर आहे पण **एखादा प्रश्न कठीण वाटल्यास त्यावर वेळ न घालविता पुढील प्रश्नाकडे वळावे.** अशा प्रकारे शेवटच्या प्रश्नापर्यंत पोहोचल्यानंतर वेळ शिल्लक राहिल्यास कठीण म्हणून वगळलेल्या प्रश्नांकडे परतणे सोईस्कर ठरेल.

(6) उत्तरपत्रिकेत एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने उत्तर दिल्यास ते तपासले जाणार नाही.

(7) **प्रस्तुत परीक्षेच्या उत्तरपत्रिकांचे मूल्यांकन करताना उमेदवाराच्या उत्तरपत्रिकेतील योग्य उत्तरांनाच गुण दिले जातील. तसेच "उमेदवाराने वस्तुनिष्ठ बहुपर्यायी स्वरूपाच्या प्रश्नांची सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. अन्यथा त्यांच्या उत्तरपत्रिकेत सोडविलेल्या प्रत्येक चार चुकीच्या उत्तरांसाठी एका प्रश्नाचे गुण वजा करण्यात येतील".**

## ताकीद

**ह्या प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपेपर्यंत ही प्रश्नपुस्तिका आयोगाची मालमत्ता असून ती परीक्षाकक्षात उमेदवाराला परीक्षेसाठी वापरण्यास देण्यात येत आहे. ही वेळ संपेपर्यंत सदर प्रश्नपुस्तिकेची प्रत/प्रती, किंवा सदर प्रश्नपुस्तिकेतील काही आशय कोणत्याही स्वरूपात प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षपणे कोणत्याही व्यक्तीस पुरविणे, तसेच प्रसिद्ध करणे हा गुन्हा असून अशी कृती करणाऱ्या व्यक्तीवर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचा अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार तसेच प्रचलित कायद्याच्या तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.**

**तसेच ह्या प्रश्नपत्रिकेसाठी विहित केलेली वेळ संपण्याआधी ही प्रश्नपुस्तिका अनधिकृतपणे बाळगणे हा सुद्धा गुन्हा असून तसे करणारी व्यक्ती आयोगाच्या कर्मचारीवृंदापैकी, तसेच परीक्षेच्या पर्यवेक्षकीयवृंदापैकी असली तरीही अशा व्यक्तीविरूद्ध उक्त अधिनियमानुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती शिक्षेस पात्र होईल.**

**पुढील सूचना प्रश्नपुस्तिकेच्या अंतिम पृष्ठावर पहा**

पर्यवेक्षकांच्या सूचनेविना हे सील उघडू नये

SEAL

www.StudentBounty.com

StudentBounty.com

कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK

www.StudentBounty.com

1. 'To climb this hill is not easy.' या विधानाचे मराठीमधून होकारार्थी विधान तयार करा.

   (1) ही टेकडी चढण्यास खूप अवघड वाटते.

   (2) हा डोंगर चढणे अशक्य आहे.

   (3) ही टेकडी चढण्याची क्रिया खूप कठीण आहे.

   (4) ही टेकडी चढणे खूप कठीण आहे.

---

2. 'शासकीय अभिलेख' या शब्दासाठी खालील योग्य पर्याय सांगा.

   (1) record of office (2) official record

   (3) officer's record (4) government record

---

3. 'I worked' या वाक्याचे मराठी नकारार्थी वाक्य ओळखा.

   (1) मी काम केलेले नाही. (2) मी काम केले आहे.

   (3) मी काम करणार आहे. (4) मी काम करू शकत नाही.

---

4. 'In depth' या वाक्प्रचाराचा मराठीत अर्थ सांगा.

   (1) वरवरचा (2) खोल (3) खोलवर व पूर्णपणे (4) खोली

---

5. 'Minute of dissent' साठी पुढीलपैकी योग्य पर्याय कोणता ?

   (1) असहमतीच्या क्षणी (2) भिन्नमत पत्रिका

   (3) मतभिन्नतेचा कालखंड (4) मतभिन्नतेचा वृत्तांत

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

StudentBounty.com

www.StudentBounty.com

StudentBounty.com

6. 'I am afraid of dogs' या वाक्याचे मराठी रूप ओळखा.

(1) मला कुत्रा घाबरतो. (2) मला कुत्रा आवडतो.

(3) मी कुत्र्याला घाबरतो. (4) मी कुत्र्याला आवडतो.

---

7. योग्य अर्थाची जोडी ओळखा.

(1) शिवराळ - uncalled

(2) एकलकोंडा - unsociable

(3) निराशावादी - abusive

(4) अनाहूत - versatile

---

8. I am suffering from fever. I will not go to School. या वाक्याचे मराठीतून केवलवाक्य तयार करा.

(1) मला ताप आल्यामुळे मी शाळेत जाणार नाही.

(2) मला ताप आला आहे म्हणून मी शाळेत जाणार नाही.

(3) मी शाळेत जाणार नाही कारण मला ताप आला आहे.

(4) मला ताप आल्यासारखे वाटल्याने मी शाळेत जात नाही.

---

9. 'आयत्यावेळी' या शब्दासाठी पर्यायी इंग्रजी शब्द सांगा.

(1) at emergency (2) at the eleventh hour

(3) at essential time (4) at leisure hour

---

10. 'नाचता येईना अंगण वाकडे' या म्हणीसाठी खालीलपैकी योग्य पर्याय सांगा.

(1) A dancer cannot dance because of bad dancing floor.

(2) A bad workman blames his tools.

(3) A dancer is not interested in dancing.

(4) A dancer blames the spectators.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

11. 'He manages well.' ह्या विधानातील 'well' हा शब्द कोणत्या शब्द प्रकारातील आहे ?

(1) क्रियाविशेषण अव्यय (2) क्रियापद

(3) सर्वनाम (4) विशेषण

---

12. 'Occupational information' साठी खालील योग्य पर्याय सांगा.

(1) व्यावसायिक माहिती (2) वहिवाटीची माहिती

(3) व्याप्तीची माहिती (4) प्रासंगिक माहिती

---

13. It rains a lot here, doesn't it ? मराठीत विरुद्धार्थी साधे विधान तयार करा.

(1) इथे अजिबात पाऊस पडत नाही. (2) इथे थोडासा पाऊस पडत आहे.

(3) इथे खूप पाऊस आहे. (4) इथे पाऊस पडत आहे.

---

14. 'हाडाचा शिक्षक' या शब्दबंधाचे इंग्रजी रूप ओळखा.

(1) a bone teacher (2) a boneless teacher

(3) a born teacher (4) a teacher who likes bones

---

15. 'उत्तर केव्हापावेतो मिळू शकेल ते मला कळवाल काय ?' या वाक्याचे इंग्रजीतील योग्य भाषांतर कोणते ?

(1) Please let's know everybody about the matter ?

(2) Will you please convey the date of reply ?

(3) May I know, when a reply can be expected ?

(4) Would you please communicate the reply to him ?

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

16. 'उथळ पाण्याला खळखळाट फार' या म्हणीसाठी खालीलपैकी योग्य पर्याय सांगा.

(1) A more noise is created by empty vessels.

(2) The noise created by vessel is not good for health.

(3) Water boil only in the vessels.

(4) Empty vessels make more noise.

---

17. 'Rain cats and dogs' या म्हणीसाठी खालीलपैकी योग्य पर्याय सांगा.

(1) मुसळधार पाऊस पडणे. (2) अतिशय कमी पाऊस पडणे.

(3) रिमझिम पाऊस पडणे. (4) मांजर व कुत्र्याचा पाऊस पडणे.

---

18. 'First and foremost' या वाक्प्रचाराचे मराठी रूप सांगा.

(1) प्रथम (2) पुढे

(3) सर्वप्रथम (4) सर्वात प्रथम आणि सर्वात शेवटी

---

19. 'From time to time' साठी खालीलपैकी योग्य पर्याय कोणता ?

(1) प्रत्येक वेळी (2) वेळोवेळी (3) वक्तशीरपणे (4) त्या त्या वेळी

---

20. 'Blood is thicker than water' या म्हणीसाठी खालीलपैकी योग्य पर्याय सांगा.

(1) पाण्यापेक्षा रक्त घट्ट असते.

(2) रक्ताचे नाते इतर नात्यांपेक्षा श्रेष्ठ असते.

(3) जोडलेली नाती रक्ताच्या नात्यापेक्षा श्रेष्ठ असतात.

(4) कधी कधी रक्त पाण्यासारखे असते.

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

www.StudentBounty.com



**खालील उतारा वाचून प्र.क्र. 21 ते 25 या प्रश्नांची योग्य ती पर्यायी उत्तरे लिहा.**

साने गुरुजींच्या साहित्यात ज्ञान असले तरी पांडित्य नाही. ते प्रेमाने अपरंपार भरले आहे. त्यात दु:खितांविषयी दया, पीडकांविरुद्ध त्वेष, सेवेचा उत्साह आणि त्यागाची तळमळ आहे. जीवनाला जागृत करून पुरुषार्थाच्या मार्गाकडे प्रवृत्त करण्याची प्रेरणा त्यात भरपूर आहे. यामुळे महाराष्ट्रातील तरुण स्त्री-पुरुषांच्या हाती हे साहित्य अवश्य पडले पाहिजे. प्राचीन परंपरा आणि आधुनिक प्रगती यांचा मनोहर संगम या साहित्यात आढळतो. आज महाराष्ट्रात नवी पिढी आपल्या प्राचीन परंपरेतील सौंदर्याला, साधुतेला पारखी होत चालली आहे. हे साहित्य ह्या पिढीतील लोकांना ते सौंदर्य व ती साधुता पटवून देईल. सनातनी विचारांत गुरफटून गेलेल्या लोकांना हे साहित्य आजच्या जिवंत प्रश्नांकडे कसे पाहावे हे शिकवील. श्रद्धा आणि बुद्धी यांचा विरोध मिटवून त्यांचे सहकार्य हे साहित्य घडवून आणील. जीवन आणि कला यांच्यामध्ये आज जी एक खाडी निर्माण झाली आहे ती भरून काढून हे साहित्य जीवनाला सौंदर्य आणि कलेला जिवंतपणा आणून देईल. कारण, हे साहित्य जीवनाशी सर्वांशाने समरस झालेल्या सत्यनिष्ठ साधकाने अंतरीच्या तळमळीने निर्माण केले आहे. ते केवळ आनंद देण्यासाठी प्रवृत्त झालेले नाही. जीवनाच्या निर्मितीसाठी त्याची निर्मिती झाली आहे. आज जगात रशियन साहित्यिकांना जे मानाचे स्थान मिळाले आहे त्याचे कारण म्हणजे रशियन साहित्यकार आपल्या कल्पनाकुंजाचा त्याग करून जीवनातील दु:खांच्या खाईत जाऊन उभे राहिले आणि प्रत्यक्षाचा परिचय करून घेऊन त्यांनी आपल्या भोवतालच्या जीवनाला वाचा फोडली. आधुनिक काळी महाराष्ट्रात समाजजीवनाशी सर्वांशाने समरस झालेला असा साहित्यकार कोण आहे, असा प्रश्न विचारल्यास साने गुरुजींकडेच कोणालाही बोट दाखवावे लागेल. महाराष्ट्रातील पहिला सत्याग्रही साहित्यनिर्माता म्हणून साने गुरुजींचे नाव महाराष्ट्राच्या इतिहासात चिरकाल प्रकाशत राहील. साने गुरुजींच्या साहित्यात तंत्रवादाला मुळीच स्थान नाही. त्यांचे लिहिणे कळकळीच्या प्रेमाचे असते, त्यात दिखाऊपणा नसतो. तथापि त्यांच्यामध्ये स्वाभाविक उच्च कलाशक्ती आहे. 'श्यामची आई' मध्ये ती अत्यंत मोठ्या प्रमाणात व्यक्त झाली आहे. अन्य ठिकाणी कोठे कोठे रचनेची शिथिलता, रसापकर्ष करणारी पाल्हाळवृत्ती, कल्पनांचा ओबडधोबडपणा इत्यादी दोष आढळतात; हे दोष त्यांनी आपल्या पांडित्याचा उपयोग करून घेण्याचे मनात आणले तर ते सहज दूर करू शकतील, त्यामुळे त्यांच्या साहित्याला अधिक संस्कार लाभेल. त्यांची प्रभा सर्वांना दिपवू शकेल. भावना हाच साहित्याचा प्राण हे खरे; परंतु आजच्या संशयवादाच्या काळात या भावनांना विवेचक बुद्धीची जोड भरपूर मिळाल्याविना ती भावना बुद्धिमंतांना तरी पुरेशी जागृत करू शकणार नाही. साने गुरुजींचा भर शुद्ध भावनेवर अधिक असतो. सामान्य जनतेला जागृत करण्याच्या कामी ते यशस्वी होत आहेत; पण आपल्या बुद्धीचा उपयोग करून सुशिक्षित बुद्धिवादी वर्गालाही त्यांनी आपला संदेश पोचविला पाहिजे. असे करण्याचे सामर्थ्य त्यांच्या अंगी वसत आहे.

---

**कच्च्या कामासाठी जागा**



StudentBounty.com

StudentBounty.com

21. जगात रशियन साहित्यिकांना मानाचे स्थान मिळाले कारण :

(अ) त्यांनी कल्पनारम्यता सोडून दिली.

(ब) त्यांनी जीवनातील दु:खांचे साहित्यातून दर्शन घडवले.

पर्यायी उत्तरांतील योग्य उत्तर कोणते ?

(1) (अ) बरोबर
(2) (ब) चूक
(3) (अ) आणि (ब) बरोबर
(4) (अ) आणि (ब) चूक

---

22. खालील विधानातून योग्य उत्तर शोधा.

(A) : साने गुरुजींच्या साहित्यात पुढील दोष दिसून येतात -

**विधाने :**

(अ) दिखाऊपणा

(ब) रचनेकडे काहीसे दुर्लक्ष

(क) कल्पनांचा ओबडधोबडपणा

(ड) रसहानी करणारी पाल्हाळवृत्ती

(B) : **पर्यायी उत्तरे :**

(1) फक्त (अ)
(2) फक्त (अ) आणि (ब)
(3) फक्त (ब), (क) आणि (ड)
(4) फक्त (क) आणि (ड)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

23. साने गुरुजींचे साहित्य महाराष्ट्रातील तरुण स्त्री-पुरुषांच्या हाती पडले पाहिजे, ते याजकरिता की,

(A) : **विधाने** -

(अ) सौंदर्य आणि साधुता यांचे महत्त्व पटविण्यासाठी.

(ब) भोवतालच्या जीवनाचे भान आणून देण्यासाठी.

(क) सनातनी परंपरेचा अभिमान जागृत करण्यासाठी.

(ड) तर्कशुद्धतेच्या संस्कारासाठी.

(B) : वरील विधानांतील पर्यायी उत्तरांतून योग्य उत्तर शोधा.

(1) फक्त (अ)

(2) (ब) आणि (क)

(3) (अ), (ब) आणि (ड)

(4) (अ) आणि (ब)

---

24. साने गुरुजींच्या साहित्यात प्रकर्षाने कोणते गुण जाणवतात ?

(A) **विधाने :**

(अ) तंत्रवादाचे उच्चाटन.

(ब) प्रेमाचे कळकळीचे लिखाण.

(क) कलाशक्तीची आसक्ती.

(ड) कल्पनारम्यता.

(B) योग्य ते पर्यायी उत्तर शोधा :

(1) फक्त (अ) आणि (क)

(2) फक्त (क) आणि (ड)

(3) फक्त (अ) आणि (ब)

(4) फक्त (ब) आणि (ड)

---

25. साने गुरुजींचे साहित्य सनातनी लोकांना कोणते मार्गदर्शन करील ?

(A) **विधाने :**

(अ) श्रद्धा आणि बुद्धीचा समेट-घडवेल.

(ब) कुरुपतेचे दर्शन घडवील.

(क) जीवन आणि कलेची दरी मिटवेल.

(ड) कलेला सर्वोच्चस्थानी आणेल.

(B) वरील विधानातील योग्य ते उत्तर पर्यायी उत्तरांत कोणते आहे?

(1) फक्त (अ)

(2) फक्त (ब), (क)

(3) फक्त (अ), (ड)

(4) फक्त (अ), (क)

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



**Read the following passage carefully and answer the following questions (26 to 30) on it.**

The reformer must know that what moves people is the authentic life, not mere writing. The newspaper and journals that Lokmanya Tilak and other reformers ran, the books they wrote, sold little, but had enormous effect. Their writing was known to reflect and be just an extension of, their exemplary lives. It was the authenticity of their lives which lent weight to their message, to their example. All knew that their lives were an integral whole - they were not moral in public life and lax in private, nor vice versa. They were not full of pious thoughts and sacred resolutions within the walls of a temple and cheats outside.

A writer who is merely entertaining his readers, even one who is merely informing them, can do what he wants with the rest of his life. But the writer, who sets out to use his pen to reform public life, cannot afford such dualities.

Here is the testimony of one great man - about the influence of another, Lokmanya Tilak.

"I believe that an editor who has anything worth saying and who commands a clientele cannot be easily hushed. He delivered his finished message as soon as he is put under duress. The Lokmanya spoke more eloquently from the Mandalay fortress than through the columns of the printed Kesari. His influence was multiplied thousand fold by his imprisonment and his speech and his pen had acquired much greater power after he was discharged than before his imprisonment. By his death we have been editing his paper without pen and speech through the sacred resolution of the people to realize his life's dream. He could possibly have done more if he were today in the flesh preaching his view. Critics like me would perhaps be still-finding fault in the expression of his or that. Today his message rules millions of hearts which are determined to raise a permanent living memorial by the fulfillment of his ambition in their lives".

---

26. A person who has '*Sacred resolutions within the walls of a temple and cheats outside*' is called :

(a) rogue (b) immoral person (c) gentleman (d) hypocrite

**Answers :**

(1) (a) and (d) only (2) (a) and (c) only

(3) (c) only (4) (d) only

---

कच्च्या कामासाठी जागा

www.StudentBounty.com

StudentBounty.com

27. In the context of the passage, a reformer becomes effective if ________.

(a) he is an author with an excellent style of writing.

(b) he is an effective political leader of the masses.

(c) he is a person with consistency in his writing and life style.

(d) he is a good critic of social practices.

**Answers :**

(1) (a) only (2) (a) and (b) only

(3) (c) only (4) (a), (c), and (d) only

---

28. Lokmanya Tilak's messages were more effective :

(a) When he delivered them through his editorials.

(b) Before his imprisonment.

(c) After his imprisonment.

(d) When he delivered speeches.

**Answers :**

(1) (a) only (2) (a) and (c) only

(3) (c) only (4) (b) only

---

29. Identify the word which has the opposite meaning to the word '*Spurious*' in the context.

(a) authentic (b) solid (c) exemplary (d) sacred

**Answers :**

(1) (a) only (2) (a) and (c) only

(3) (b) only (4) (a) and (d) only

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



30. Which of the following types of writers can be moral in their personal life and lax in public life ?

(a) Those who want to reform people.

(b) Those who want to entertain people.

(c) Those who lead an authentic life.

(d) Those whose writing is an extension of their exemplary lives.

**Answers :**

(1) (a) and (d) only (2) (a) and (c) only

(3) (b) only (4) (d) only

---

31. कोणत्या प्रकारच्या प्रश्नोत्तरासाठी प्रत्येक दिवशी विधानमंडळाच्या सभागृहात एकच तास राखून ठेवला जातो ?

(1) अतारांकित प्रश्न (2) अल्पसूचना प्रश्न

(3) तारांकित प्रश्न (4) वरीलपैकी एकही नाही

---

32. सन 1985 पर्यंत महाराष्ट्र शासनाने खालीलपैकी कोणते उद्दीष्ट ठेवले होते ?

(1) शासन कारभारात 50% मराठी भाषा आणणे.

(2) शासन कामकाजात 70% मराठी व 30% इंग्रजी भाषा वापरणे.

(3) 25% मराठी भाषेचा वापर करणे.

(4) संपूर्ण कारभारात मराठी भाषा आणणे.

---

33. विधी व न्याय विभागाचा सल्ला खालीलपैकी कोणत्या अधिकाऱ्याच्या स्वाक्षरीने मागवावा ?

(1) कक्ष अधिकारी (2) अवर सचिव (3) सहाय्यक (4) उपसचिव

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

34. **विधान (a)** : पत्र/शासन आदेश यामध्ये द्विअर्थी भाषा/शब्दसमुह यांचा वापर करू नये.

**विधान (b)** : वाक्याचा/शब्दाचा अनेक अर्थ निघत असल्यास संबंधिताकडून शासनास अपेक्षित नसलेला परंतु त्यांच्या हिताचा अर्थ त्यामधून काढला जाऊ शकतो.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्ही विधाने बरोबर आहेत परंतु (b) हे (a) चे कारण असू शकत नाही.

(2) दोन्ही विधाने चुकीची आहेत.

(3) विधान (a) बरोबर असून (b) चुकीचे आहे.

(4) दोन्ही विधाने बरोबर असून (b) हे (a) चे योग्य कारण आहे.

---

35. योग्य जोड्या जुळवा.

| | **बाब/विषय** | | **पत्रव्यवहाराचा प्रकार** |
|---|---|---|---|
| (a) | खाजगी व्यक्तींच्या पत्रांना उत्तरे देणे | (i) | कार्यालयीन आदेश |
| (b) | नविन पदांच्या निर्मितीस मंजूरी देणे | (ii) | ज्ञापन |
| (c) | कार्यालयीन कर्मचाऱ्यांच्या अंतर्गत बदल्या करणे | (iii) | शासन निर्णय |
| (d) | शिस्तभंगाची कारवाई संदर्भातील खुलासा मागविणे | (iv) | साधेपत्र |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (i) | (ii) | (iii) | (iv) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iv) | (i) | (iii) | (ii) |
| (4) | (iii) | (iv) | (ii) | (i) |

---

36. कोणते ठिकाण शासन यंत्रणेच्या केंद्रस्थानी आहे ?

(1) जिल्हा परीषद

(2) मंत्रालय

(3) विभागीय आयुक्त कार्यालय

(4) जिल्हाधिकारी कार्यालय

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

37. महत्वाचे आदेश निघाल्यानंतर अशा आदेशाची एक जादा प्रत कार्यासनात ________ करीता काढून ठेवावी.

(1) सारसंग्रह (2) निवडनस्ती (3) कार्यासन नस्ती (4) उपसचिव नस्ती

---

38. अर्धशासकीय पत्रव्यवहार करण्यासाठी खालीलपैकी कोणती जोडी योग्य **नाही** ?

(1) सचिव - विभागीय आयुक्त

(2) उपसचिव - जिल्हाधिकारी

(3) सहसचिव - नायब तहसिलदार

(4) कक्ष अधिकारी - तहसिलदार

---

39. **विधान (a)** : निर्गमित करण्यात येणाऱ्या प्रत्येक शासननिर्णयामध्ये, ''महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने'', या वाक्याचा समावेश असतोच.

**विधान (b)** : ''महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,'' या वाक्याचा समावेश न करताही काही प्रकरणी परिपत्रक, ज्ञापन निर्गमित करण्यात येतात.

**पर्यायी उत्तरे :**

(1) दोन्हीही विधाने बरोबर आहेत.

(2) विधान (a) बरोबर असून विधान (b) चुकीचे आहे.

(3) दोन्हीही विधाने चुकीची आहेत.

(4) विधाने (b) बरोबर असून विधान (a) चुकीचे आहे.

---

40. 'राज्य निवडणूक आयोग' कार्यालयाशी पत्रव्यवहार करावयाचा असल्यास तो कोणाशी करण्यात यावा ?

(1) सचिव, राज्य निवडणूक आयोग (2) मुख्य निवडणूक अधिकारी

(3) उपसचिव, राज्य निवडणूक आयोग (4) आयुक्त, राज्य निवडणूक आयोग

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**41.** चांगल्या पत्रव्यवहाराची लक्षणे कोणती ?

(a) अचूकपणा (b) संक्षिप्तपणा (c) स्पष्टपणा

**पर्यायी उत्तरे :**

(1) केवळ पर्याय (a)
(2) सर्व पर्याय चूकीचे आहेत
(3) सर्व पर्याय योग्य आहेत
(4) पर्याय (b) व (c)

---

**42.** खालीलपैकी कोणत्या प्रकरणी टिप्पणीलेखनाची आवश्यकता नसते ?

(a) धोरण स्पष्ट असेल अशा प्रकरणी उत्तरे देताना
(b) निरंक माहिती पाठविणे
(c) रजा मंजूरीची ठरावीक साच्याची प्रकरणे
(d) संबंध नसलेली पत्रे योग्य त्या विभागाकडे पाठविणे

**पर्यायी उत्तरे :**

(1) सर्व पर्याय चूकीचे आहेत.
(2) पर्याय (a), (b) व (d) बरोबर आहेत.
(3) सर्व पर्याय बरोबर आहेत.
(4) पर्याय (b), (c) व (d) बरोबर आहेत.

---

**43.** मंत्रीमंडळास सादर करावयाच्या प्रत्येक चक्रमुद्रीत प्रतीवर विभागाच्या __________ चक्रमुद्रीत सही असणे जरुरीचे असते.

(1) अवर सचिवांची (2) उप सचिवांची (3) सचिवांची (4) सह सचिवांची

---

**44.** एखाद्या विषयावरील प्रकरण इतर विभागांना दाखविणे जरुर असल्यास त्याचा उल्लेख टिप्पणीमधील कोणत्या परिच्छेदात करण्यात यावा ?

(1) पहिल्या (2) दुसऱ्या (3) शेवटच्या (4) तिसऱ्या

---

**कच्च्या कामासाठी जागा**

**P.T.O.**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



45. राज्यपालांच्या आदेशानुसार व नावाने व अधिनियमाच्या उपबंधाखाली खालीलपैकी कोणता पत्रव्यवहार निर्गमित केला जातो ?

(1) शासन आदेश (2) शासन निर्णय (3) शासन परीपत्रक (4) शासन अधिसूचना

46. शासकीय योजनांना व्यापक प्रसिद्धी देण्याचे काम खालीलपैकी कोणती यंत्रणा करते ?

(1) सामान्य प्रशासन विभाग (2) मराठी भाषा विकास विभाग

(3) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय (4) महसूल व वन विभाग

47. एखादे पत्र किंवा प्रकरण निकालात काढणे सोईचे जावे म्हणून त्यावर __________ केले जाते.

(1) मतप्रदर्शन (2) पत्र लेखन (3) टिप्पणी लेखन (4) विचारमंथन

48. अधिनियमातील तरतुदीनुषंगाने एखाद्या विशिष्ट बाबीवर जनतेच्या हरकती व सूचना मागविण्यासाठी कोणत्या पत्रव्यवहाराचा वापर करण्यात येतो ?

(1) शासन पत्र (2) कार्यालयीन आदेश (3) शासन ज्ञापन (4) शासन अधिसूचना

49. मंत्रालयात 'कार्यासन अधिकारी' पद्धतीस सुरुवात कधी झाली ?

(1) एप्रिल 1975 (2) मार्च 1972 (3) मे 1974 (4) जुलै 1975

50. शासन निर्णयामध्ये दुरुस्ती किंवा फेरफार करावयाचे झाल्यास कोणता पत्रव्यवहार केला जातो ?

(1) शासन परीपत्रक (2) शुद्धीपत्र व पुरकपत्र (3) शासन ज्ञापन (4) अर्धशासकीय पत्र

51. विशिष्ट अक्षरांचा किंवा शब्दांचा अरोह-अवरोह सुचविण्यासाठी पुढील चिन्ह वापरतात.

(1) विकल्पचिन्ह (2) लोपचिन्ह (3) संयोगचिन्ह (4) अवग्रहचिन्ह

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



52. 'सिंह' या शब्दाचा समानार्थी नसलेला शब्द पर्यायी उत्तरांतून शोधा :

(1) आदित्य (2) केसरी (3) मृगेंद्र (4) वनराज

---

53. 'राम वनात जातो' या वाक्यात एकूण मूलध्वनी किती आहेत ?

(1) तीन (2) सात (3) चौदा (4) सोळा

---

54. द्विगू समासाचे उदाहरण ओळखा :

(1) सप्ताह (2) कमलनयन (3) मुखचंद्र (4) ग्रंथकार

---

55. वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरुन नुसताच काळाचा बोध होत असेल तर त्यास ________ वाक्य म्हणतात.

(1) कालिक (2) स्वार्थी (3) विध्यर्थी (4) समकालिक

---

56. "दमडीची खरेदी आणि खंडीचा भाव" या म्हणीचा योग्य अर्थ कोणता ?

(1) क्षुल्लक गोष्टीला अधिक खर्च (2) केवळ विचारपूसच

(3) दात कोरून पोट भरणे (4) हे करू की ते करू

---

57. मूळ शब्दाच्या मागे पूर्वी एक किंवा अधिक अक्षरे जोडतात त्यांना ________ म्हणतात.

(1) प्रत्यय घटित (2) समास घटित (3) उपसर्ग घटित (4) अभ्यस्त

---

58. अधोरेखित शब्दाची जात ओळखा.

ही वाट डोंगराकडे जाते.

(1) करणवाचक शब्दयोगी अव्यय (2) दिक्‌वाचक शब्दयोगी अव्यय

(3) योग्यतावाचक शब्दयोगी अव्यय (4) कालवाचक शब्दयोगी अव्यय

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com

59. योग्य जोड्या जुळवा :

| | **विभक्ती** | | **प्रत्यय** |
|---|---|---|---|
| (a) | चतुर्थी | (i) | त, ई, आ |
| (b) | तृतीया | (ii) | ने, ए, शी |
| (c) | षष्ठी | (iii) | स, ला, ते |
| (d) | सप्तमी | (iv) | चा, ची, चे |

**पर्यायी उत्तरे :**

| | **(a)** | **(b)** | **(c)** | **(d)** |
|---|---|---|---|---|
| (1) | (iii) | (ii) | (iv) | (i) |
| (2) | (iv) | (iii) | (i) | (ii) |
| (3) | (iii) | (iv) | (i) | (ii) |
| (4) | (i) | (ii) | (iii) | (iv) |

---

60. प्, फ् या व्यंजनांचे उच्चारस्थान लिहा.

(1) दंत्योष्ठ्य (2) कंठोष्ठ्य (3) ओष्ठ्य (4) दंततालव्य

---

61. 'परंतु' हा शब्द ________ आहे.

(1) तत्सम (2) तद्‌भव (3) देशी (4) हिंदी

---

62. खाली दिलेल्या वाक्यातील रिकाम्या जागेत योग्य पर्याय लिहा :

• मराठी वर्णमालेत ________ वर्ण आहेत.

(1) 41 (2) 42 (3) 48 (4) 46

---

63. खालील शब्दांतून 'शुद्ध शब्द' ओळखा.

(1) साहयकारी (2) सहाय्यकारी (3) सहायकारी (4) साहाय्यकारी

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



64. पुढील शब्दांतून 'अंशाभ्यस्त' शब्दाचा अचूक पर्याय निवडा :

(1) दगडबिगड (2) कडकडाट (3) गडगडाट (4) फडफड

65. खालीलपैकी लेखन नियमांनुसार शुद्ध शब्द कोणता ? योग्य पर्याय निवडा.

(1) और्ध्व देहिक (2) उर्ध्व देहिक (3) और्ध्व देहीक (4) उर्ध्व देहीक

66. पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा.

(1) पृथ:करण (2) पृथक्करण (3) पृथ्थकरण (4) पृथ:क्करण

67. रिकाम्या जागी योग्य पर्याय शोधा :

एखाद्या गोष्टीचे हुबेहूब वर्णन जेथे केलेले असते तेथे __________ अलंकार होतो.

(1) स्वभावोक्ती (2) पर्यायोक्ती (3) व्याज-स्तुती (4) चेतन-गुणोक्ती

68. खालीलपैकी 'प्रत्यय घटित शब्द' ओळखा :

(1) चोर (2) सरहद्द (3) बागवान (4) घर घर

69. खाली दिलेल्या सामासिक शब्दाचा प्रकार ओळखा :

'गुळांबा'

(1) कर्मधारय (2) तत्पुरुष (3) मध्यमपद लोपी (4) बहुव्रीही

70. ''ओठ कशाचे ? देठचि फुलल्या पारिजातकाचे।'' या ओळीतील अलंकार कोणता ?

(1) उत्प्रेक्षा (2) रूपक (3) उपमा (4) अपन्हुती

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



71. खालील म्हणीचा अर्थ पर्यायातून अचूक निवडा :

"गोगलगाय पोटात पाय ...."

(1) निरूपयोगी माणूस पण कृतीने वाईट (2) गॉगल लावणारी स्त्री

(3) हळूहळू चालणारा प्राणी (4) गरीब आणि कफल्लक माणूस

72. 'डोके, डोळे, पोट, गुडघा' हे शब्द कोणत्या प्रकारचे आहेत ?

(1) तत्सम (2) स्वदेशी (3) देशी (4) अरबी

73. खालील वाक्याचा पर्यायी उत्तरांतून प्रयोग ओळखा.

'तू मला पुस्तक दिलेस.'

(1) कर्म – भाव संकर प्रयोग (2) कर्तृ – कर्म संकर प्रयोग

(3) कर्तृ – भाव संकर प्रयोग (4) भावकर्तरी प्रयोग

74. खालील शब्दाची विभक्ती ओळखा :

'तुझ्यापायी...'

(1) द्वितीया (2) तृतीया (3) षष्ठी (4) सप्तमी

75. पुढीलपैकी शुद्ध शब्द ओळखा :

(1) वाल्मिकी (2) वाल्मीकी (3) वाल्मकी (4) वार्लमिकी

76. खालील वाक्य कोणत्या प्रकारचे आहे ?

- "निमंत्रण आले तर मी येईन".

(1) स्वार्थी (2) विद्यर्थी (3) आज्ञार्थी (4) संकेतार्थी

77. खालीलपैकी उपसर्ग घटित शब्द ओळखा :

(1) अवमान (2) रिकामटेकडा (3) अडकित्ता (4) मेहनत

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com



78. अलंकार ओळखा :

किती माझा कोंबडा मजेदार। मान त्याची कितितरी बाकदार।

शिरोभागी तांबडा तुरा हाले। जणू जास्वंदी फूल उमललेले।

(1) उत्प्रेक्षा (2) उपमा (3) रूपक (4) श्लेष

---

79. तालव्य वर्ण असणाऱ्या शब्दाचा पर्याय ओळखा.

(1) चांदोबा (2) चाकर (3) चरित्र (4) चोच

---

80. पुढीलपैकी शुद्ध शब्दयोगी अव्यय ओळखा.

(1) तुम्हीपण (2) दारोदारी (3) अंगणापुढे (4) झोपडीमागे

---

81. 'आत', 'मध्ये', 'खाली', 'ऐवजी' ही अव्यये कोणत्या विभक्तीची आहेत ?

(1) द्वितीया (2) तृतीया (3) पंचमी (4) सप्तमी

---

82. 'सायंकाल' या उपसर्ग साधित शब्दाला कोणता उपसर्ग लागला आहे, खालीलपैकी योग्य पर्याय निवडा :

(1) सायम् (2) अति (3) सा (4) संध्या

---

83. जेव्हा क्रियापदाच्या रूपावरुन कर्तव्य, शक्यता या अर्थाचा बोध होतो तेव्हा त्याला ______ म्हणतात.

(1) स्वार्थ (2) आज्ञार्थ (3) विध्यर्थ (4) संकेतार्थ

---

84. 'अकलेचा खंदक' - या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा :

(1) मूर्ख मनुष्य (2) खाणकाम (3) मार देणे (4) उकरून काढणे

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



85. 'अनन्वय' हा अलंकार केव्हा प्रकटतो ?

(1) उपमेयास उपमेयाशिवाय दुसरे उपमानच नाही असे वर्णन आल्यास.

(2) उपमेय आणि उपमान यांच्यात संबंध नसताना.

(3) उपमान फारसे महत्त्वाचे नाही, असे वर्णन आल्यास.

(4) काव्यातील शेवटच्या पदबंधात एकसारखेपणा आल्यास.

---

86. 'Horticulturist' या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा :

(1) फलसंस्करण अधिकारी (2) फलोत्पादन अधिकारी

(3) फलोत्पादन विद्यावेत्ता (4) वनोपयोजन अधिकारी

---

87. पुढील चार पर्यायातून 'अशुद्ध शब्द' ओळखा.

(1) इडापीडा . (2) इष्क (3) इष्ट (4) इंद्रिय

---

88. समाहार द्वंद्व समासात त्याच जातीच्या वस्तूंच्या _________ याला महत्व असते.

(1) विग्रह (2) पहिले पद (3) प्रकार (4) समुदाय

---

89. खाली दिलेल्या सामासिक प्रकाराचे उदाहरण ओळखा :

- द्विगू समास

(1) यथाशक्ती (2) मामेभाऊ (3) कृष्णार्जुन (4) नवरात्र

---

90. य्, र्, ल्, व् - या व्यंजनांना काय म्हणतात ?

(1) अर्धस्वर (2) उष्मे (3) विसर्ग (4) स्वरादी

---

91. 'तुम्ही पाहिलेले मंदिर फार प्राचीन आहे.' हे वाक्य रचनाप्रकारातील कोणत्या प्रकारातील आहे ?

(1) संयुक्तवाक्य (2) मिश्रवाक्य (3) केवलवाक्य (4) गौणवाक्य

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**92.** पुढील रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा :

- संस्कृतात क्रियापदाला ________ म्हणतात.

(1) आख्यात (2) संयुक्त क्रियापद (3) धातुसाधिते (4) सामान्य रूप

---

**93.** 'मुलगी' या अर्थाने पुढील शब्द वापरत नाहीत :

(1) कन्या (2) दुहिता (3) तनया (4) रजनी

---

**94.** 'सूर्य' या शब्दाचा समानार्थी शब्द :

(1) सुधाकर (2) सलिल (3) सविता (4) तारापती

---

**95.** Vacancy : या शब्दासाठी पारिभाषिक शब्द ओळखा :

(1) पद (2) रिक्त पद (3) भरलेले पद (4) प्रमुख पद

---

**96.** ''संत म्हणति, सप्त पदे सहवासे सख्य साधुशी घडते' या ओळीतील अलंकार कोणता ?

(1) यमक (2) श्लेष (3) अनुप्रास (4) उपमा

---

**97.** पुढील शब्दांतून प्रत्ययघटित शब्दाचा अचूक पर्याय निवडा :

(1) आजन्म (2) नालायक (3) पडछाया (4) पूजनीय

---

**98.** गाळलेल्या जागी योग्य शब्द वापरा.

नामांच्या व सर्वनामांच्या अनेकवचनी सामान्यरूपांवर विभक्तिप्रत्यय व शब्दयोगी लावताना ________ द्यावा.

(1) अनुस्वार (2) विराम (3) आघात (4) विसर्ग

---

**99.** 'ती गुलाबी उषा म्हणजे परमेश्वराचे प्रेम जणू!' - अलंकार ओळखा :

(1) उत्प्रेक्षा (2) दृष्टान्त (3) अर्थांतरन्यास (4) विरोधाभास

---

**कच्च्या कामासाठी जागा**



www.StudentBounty.com

StudentBounty.com



**100.** हातपाय गाळणे : या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ ओळखा :

(1) घाम गाळणे (2) धीर सोडणे (3) भीती न वाटणे (4) श्रम करणे

**101.** खालील वाक्याचा काळ ओळखा.

मी निबंध लिहीत जाईन.

(1) अपूर्ण भविष्यकाळ (2) पूर्ण भविष्यकाळ (3) साधा भविष्यकाळ (4) रीती भविष्यकाळ

**102.** 'मुले सहलीला जातील का' या वाक्याचा कोणत्या गटात समावेश करता येईल ?

(1) विधानार्थी (2) प्रश्नार्थी (3) उद्‌गारार्थी (4) आज्ञार्थी

**103.** 'तंबाखू' हा शब्द कोणत्या भाषेतील आहे ?

(1) कानडी (2) मराठी (3) फारसी (4) पोर्तुगीज

**104.** 'एरंडाचे गुऱ्हाळ' या वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा :

(1) आकस्मिक आपत्ती (2) कंटाळवाणे भाषण

(3) शेवट (4) प्रारंभ

**105.** 'बसतो' या क्रियापदाचे आख्यात ओळखा.

(1) वाख्यात (2) ई-आख्यात (3) प्रथम-ताख्यात (4) ईलाख्यात

**106.** गद्यात किंवा पद्यात एकाच अक्षराची पुनरावृत्ती होऊन त्यातील नादामुळे सौंदर्य प्राप्त होणाऱ्या अलंकारास काय म्हणतात ?

(1) अनुप्रास (2) उपमा (3) यमक (4) रूपक

**107.** अर्थानुरोधाने होणारा 'अकरणरूपी प्रकार' कोणत्या पर्यायी उत्तरात आहे ?

(1) तुम्ही आमच्याकडे केव्हा याल ? (2) बापरे ! केवढे हे सोंग !

(3) विजय मुळीच अभ्यास करीत नाही. (4) मला परीक्षेत पहिला नंबर मिळाला.

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

108. 'अपकर्ष' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द कोणता ?

(1) आकर्ष (2) उपकर्ष (3) परकर्ष (4) उत्कर्ष

---

109. खालील क्रियापद प्रकाराचे अचूक उदाहरण ओळखा :

- शक्य क्रियापद

(1) ते मूल हसते.

(2) त्या आजारी माणसाला आता थोडे बसवते.

(3) आईच्या आठवणीने तिचे डोळे पाणावले.

(4) सकाळी फिरायला गेले पाहिजे.

---

110. पुढील वाक्याचा प्रकार ओळखा :

पाऊस आला तरी सहल ही जाणारच.

(1) संकेतार्थ (2) स्वार्थ (3) विध्यर्थ (4) आज्ञार्थ

---

111. खालील शब्दयोगी अव्ययातील 'शुद्ध शब्दयोगी अव्यय' कोणते ?

(1) सुद्धा (2) जवळ (3) कडे (4) सहित

---

112. खालीलपैकी तद्‌भव शब्द ओळखा :

(1) पृथ्वी (2) दूध (3) भगवान (4) जल

---

113. खालील वाक्यातील अधोरेखित शब्दाची जात सांगा ?

'आमचे वडील म्हणजे जमदग्नी आहेत.'

(1) विशेषनाम (2) सामान्यनाम (3) भाववाचकनाम (4) पुरुषवाचक सर्वनाम

---

114. ''चंद्रमौळी घर'' या वाक्प्रचाराचा योग्य अर्थ कोणता ?

(1) श्रीमंताचे घर (2) देवाचे घर (3) गरीब माणसाचे घर (4) सजवलेले घर

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**115.** शुद्ध शब्दरूप ओळखा :

(1) षष्ठ्यब्दीपूर्ती (2) शष्ठयब्दीपूर्ती (3) षष्ठयब्दिपुर्ती (4) षष्ठयबिदीपूर्ती

**116.** पुढीलपैकी शुद्ध शब्दरूप ओळखा.

(1) प्रविष्ठ (2) प्रवीष्ठ (3) प्रविष्ट (4) प्रवीष्ट

**117.** 'उरलेला रस्सा, उकडलेली अंडी, पुलाव, टोमॅटो खाऊन रस्ता तृप्त झाला'. अलंकार ओळखा.

(1) अन्योक्ती (2) चेतनगुणोक्ती (3) दृष्टान्त (4) स्वभावोक्ती

**118.** 'व्यर्थ उद्‌गारवाची अव्यय' असणारे वाक्य पर्यायी उत्तरांतून शोधा.

(1) मी आपला काय बोलणार (2) शिव शिव शिव काय हा प्रसंग

(3) बापरे केवढी ही रास (4) शाबास, स्वरुप चांगले यश मिळविलेस

**119.** पुढील सर्वनामाचा प्रकार ओळखा :

- पुस्तके कोणी नेली ?

(1) पुरुषवाचक सर्वनाम (2) दर्शक सर्वनाम (3) सामान्य सर्वनाम (4) प्रश्नार्थक सर्वनाम

**120.** 'मला पुण्याला जायचे आहे' - वाक्याचा प्रयोग ओळखा :

(1) अकर्मक कर्तरी (2) सकर्मक कर्तरी (3) सकर्मक भावे (4) कर्मणी

**121.** रिकाम्या जागी योग्य पर्याय भरा :

मायेवाचून रड नाही, आगीवाचून _________ नाही.

(1) जाळ (2) पेट (3) कढ (4) रड

**122.** 'त्याने मुलाला शाळेत घातले' - प्रयोग ओळखा.

(1) कर्मभावसंकर (2) कर्तृकर्मसंकर (3) कर्तृभावसंकर (4) कर्मणी

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**123.** पोटात आग पडणे : या वाक्प्रचाराचा अचूक अर्थ ओळखा :

(1) खूप चीडचीड करणे. (2) खूप तहान लागणे.

(3) खूप भूक लागणे. (4) खूप बडबड करणे.

---

**124.** 'Investigator' या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा :

(1) अन्वेषक (2) अभीक्षक (3) अवेक्षक (4) सर्वेक्षक

---

**125.** खालील वाक्यप्रकारांतून 'केवल वाक्य' असलेले उत्तर पर्यायी उत्तरांतील कोणते ते सांगा ?

(1) जेव्हा माझ्या आजीने मला एक डबा पाठविला तेव्हा त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(2) माझ्या आजीने मला गोड खाऊचा एक डबा पाठविला.

(3) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला. त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

(4) माझ्या आजीने मला एक डबा पाठविला आणि त्यात खाण्याचे गोड पदार्थ होते.

---

**126.** ''क्षुल्लक गोष्टीला अधिक खर्च' या अर्थाची म्हण ओळखा :

(1) दमडीची खरेदी आणि खंडीचा भाव

(2) दही खाऊ की मही खाऊ

(3) दमडीची कोंबडी रुपयाचा मसाला

(4) दमडीचा सौदा येरझारा चौदा

---

**127.** खाली समासाचे नाव दिले आहे त्याच प्रकारच्या समासाचे योग्य उदाहरण निवडा :

'द्वंद्व'

(1) पापपुण्य (2) साखरभात (3) पीतांबर (4) मुखकमल

---

**128.** पुस्तकातील उतारा जसाच्या तसा सुवाच्च अक्षरात बिनचूक विरामचिन्हांसह लिहून दाखविण्याच्या क्रियेला ________ म्हणतात.

(1) श्रुतलेखन (2) अनुलेखन (3) शुद्धलेखन (4) लेखन

---

**कच्च्या कामासाठी जागा**

P T O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

129. राजा पळून जाईल किंवा (तो) शरण येईल. या वाक्याचा प्रकार ओळखा.

(1) केवल वाक्य (2) संयुक्त वाक्य (3) मिश्र वाक्य (4) गौण वाक्य

130. खालीलपैकी परभाषीय शब्द कोणता ?

(1) डबा (2) भोजन (3) क्रीडा (4) फराळ

131. पुढील क्रियापद प्रकाराला जुळणारे अचूक उदाहरण निवडा.

- संयुक्त क्रियापद –

(1) बाळ, एवढा लाडू खाऊन टाक.

(2) आईच्या आठवणीने तिचे डोळे पाणावले.

(3) मला दररोज वीस मैल चालवते.

(4) खेड्यातील माणसे आता बरीच पुढारली.

132. रिकाम्या जागी योग्य शब्द वापरा :

मराठीतील तत्सम इकारान्त व उकारान्त शब्द __________ लिहावेत.

(1) ऱ्हस्वात (2) दीर्घान्त (3) स्वान्त (4) सामासिक

133. 'दुसऱ्याला त्याग करायला सांगायचे आणि आपण मात्र काहीच नाही करायचे'. – या अर्थाची म्हण ओळखा :

(1) हलवायाच्या घरावर तुळशीपत्र.

(2) हलक्या कानाचा तो हलक्या मनाचा.

(3) हपापाचा माल गपापा.

(4) हातावर साखर अन् मानेवर कातर.

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

StudentBounty.com

**134.** खालील पर्यायी उत्तरांतील 'नामसाधित अंशाभ्यस्त शब्द' असलेले योग्य पर्यायी उत्तर कोणते ?

(1) गेलाबिला (2) उद्याबिद्या (3) वाईटसाईट (4) झाडबीड

**135.** 'Literary Competence' – या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा :

(1) साहित्यिक क्षमता (2) साहित्यिक स्पर्धा (3) वाङ्‌मयीन ज्ञान (4) भाषा कौशल्य

**136.** पुढील शब्दापासून निर्माण झालेले विशेषण शोधा :

- पिक –

(1) पिकलेला (2) पिकबिक (3) पिक पिक पिकाक (4) पकवलेला

**137.** 'Agriculture Overseer' या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा :

(1) कृषिसेवक (2) कृषि पर्यवेक्षक (3) कृषिअवेक्षक (4) कृषिविद्यावेत्ता

**138.** समानस्थानी, समान प्रयत्नाने उत्पन्न होणाऱ्या स्वरांना काय म्हणतात ? पुढील योग्य पर्याय निवडा.

(1) संयुक्त स्वर (2) द्विगुणित स्वर (3) सवर्ण स्वर (4) असवर्ण स्वर

**139.** 'मृगाच्या नयनाप्रमाणे आहेत नयन जिचे' या अर्थाचा सामासिक शब्द व त्याच्या समासाचे नाव यांची योग्य जोडी निवडा.

(1) मृगनयना – बहुव्रीही समास (2) मृगनयना – द्वंद्वसमास

(3) नयनमृग – मध्यमपदलोपी समास (4) नयनमृग – द्विगू समास

**140.** 'ट्, ठ्, ड्, ढ्, ण्' ही ________ वर्ण आहेत.

(1) मूर्धन्य (2) तालव्य (3) कंठ्य (4) दंत्य

**141.** खालील शब्दांपैकी तत्सम शब्द ओळखा :

(1) घर (2) भूगोल (3) भाऊ (4) गाव

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

www.StudentBounty.com

StudentBounty.com

142. पुढीलपैकी कोणत्या शब्दांत 'आ कारांत' सामान्यरुप येते ?

(1) वाघ - वाघास (2) हत्ती - हत्तीचा (3) भाऊ - भावाचा (4) लाडू - लाडवाचा

---

143. Board of Censors या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा :

(1) नियंत्रणमंडळ (2) परीक्षकमंडळ (3) अभ्यवेक्षकमंडळ (4) अभ्यासमंडळ

---

144. गेली तीन वर्षे तो एच.एस.सी.ची वारी करीत आहे अधोरेखित वाक्प्रचाराचा अर्थ ओळखा :

(1) सतत नापास होणे (2) पंढरपूरला जाणे (3) तीर्थयात्रेला जाणे (4) करार करणे

---

145. खालील म्हणीचा योग्य तो अर्थ पर्यायी उत्तरांतून शोधा.

'दुधाची तहान ताकाने भागत नाही'.

(1) दुधासाठी ताक असावे लागते.

(2) गरज ज्या वस्तूची असते, ती त्याच वस्तूच्या प्राप्तीने साध्य होते.

(3) महत्त्वाच्या वस्तूसाठी क्षुल्लक वस्तू चालते.

(4) श्रीमंताची तहान गरिबाच्या ओंजळीने भागते.

---

146. खाली दिलेल्या 'तृतीया तत्पुरुष' या सामासिक शब्दाशी जुळणारा योग्य शब्द निवडा :

- तोंडपाठ

(1) मानवनिर्मित (2) घरधनी (3) घरजावई (4) पोटशूळ

---

147. 'Houseman' या शब्दासाठी मराठीतील पारिभाषिक शब्द ओळखा.

(1) गृहस्वच्छक (2) गृहपाल/आवासपाल (3) गृहप्रमुख (4) आवासी

---

148. खालीलपैकी 'दंत्य' वर्ण कोणता ?

(1) ट् (2) ज् (3) ग् (4) ध्

---

**कच्च्या कामासाठी जागा**

www.StudentBounty.com

149. खाली दिलेल्या सामासिक प्रकाराचे उदाहरण ओळखा :

द्विगू समास

(1) त्रिभुवन (2) मुखचंद्र (3) महादेव (4) नीलकंठ

---

150. सयमक - सार्थ- निरर्थ अभ्यस्त शब्द खालीलपैकी कोणता नाही, योग्य पर्याय निवडा.

(1) शेजारीपाजारी (2) उधारपाधार (3) आंबटचिंबट (4) सोनसाखळी

---

-o0o-

**कच्च्या कामासाठी जागा**

P.T.O.

StudentBounty.com
www.StudentBounty.com

StudentBounty.com

**सूचना** — (पृष्ठ 1 वरून पुढे....)

(8) प्रश्नपुस्तिकेमध्ये विहित केलेल्या विशिष्ट जागीच कच्चे काम (रफ वर्क) करावे. प्रश्नपुस्तिकेव्यतिरिक्त उत्तरपत्रिकेवर वा इतर कागदावर कच्चे काम केल्यास ते कॉपी करण्याच्या उद्देशाने केले आहे, असे मानले जाईल व त्यानुसार उमेदवारावर शासनाने जारी केलेल्या "परीक्षांमध्ये होणाऱ्या गैरप्रकारांना प्रतिबंध करण्याबाबतचे अधिनियम-82" यातील तरतुदीनुसार कारवाई करण्यात येईल व दोषी व्यक्ती कमाल एक वर्षाच्या कारावासाच्या आणि/किंवा रुपये एक हजार रकमेच्या दंडाच्या शिक्षेस पात्र होईल.

(9) सदर प्रश्नपत्रिकेसाठी आयोगाने विहित केलेली वेळ संपल्यानंतर उमेदवाराला ही प्रश्नपुस्तिका स्वत:बरोबर परीक्षाकक्षाबाहेर घेऊन जाण्यास परवानगी आहे. **मात्र परीक्षा कक्षाबाहेर जाण्यापूर्वी उमेदवाराने आपल्या उत्तरपत्रिकेचा भाग-1 समवेक्षकाकडे न विसरता परत करणे आवश्यक आहे.**

---

## नमुना प्रश्न

प्रश्न क्र. **201.** "अंगावर काटा उभा रहाणे" या वाक्प्रचाराचा अर्थ काय ?

(1) अंग शहारणे  (2) रोमांचित होणे

(3) अतिशय भिती वाटणे  (4) बहरुन येणे

ह्या प्रश्नाचे योग्य उत्तर "(3) अतिशय भिती वाटणे" असे आहे. त्यामुळे या प्रश्नाचे उत्तर "(3)" होईल. यास्तव खालीलप्रमाणे प्रश्न क्र. **201** समोरील उत्तर-क्रमांक "③" हे वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखविणे आवश्यक आहे.

प्र. क्र. **201.** ① ② ● ④

अशा पद्धतीने प्रस्तुत प्रश्नपुस्तिकेतील प्रत्येक प्रश्नाचा तुमचा उत्तरक्रमांक हा तुम्हाला स्वतंत्ररीत्या पुरविलेल्या उत्तरपत्रिकेवरील त्या त्या प्रश्नक्रमांकासमोरील संबंधित वर्तुळ पूर्णपणे छायांकित करून दाखवावा. **ह्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉलपेन वापरावे, पेन्सिल वा शाईचे पेन वापरू नये.**

---

**कच्च्या कामासाठी जागा / SPACE FOR ROUGH WORK**

SEAL

www.StudentBounty.com